सूचना का अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३००४

अपिलार्थी श्री. किरण राम सावंत

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
शक्ति संवा संघ संचलित शक्ति सेवा संघ माध्यमिक विद्यालय,
मोरेश्वर भोईर शिक्षण केंद्र, एस. एन. दुबे रोड,
रावलपाडा, दहिसर (पू.), मुंबई ४०००६८.

प्रथम अपिलीय अधिकारी
शक्ति संवा संघ संचलित शक्ति सेवा संघ माध्यमिक विद्यालय,
मोरेश्वर भोईर शिक्षण केंद्र, एस. एन. दुबे रोड,
रावलपाडा, दहिसर (पू.), मुंबई ४०००६८.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०२.२०२३

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
२९.०४.२०२२	१४.०६.२०२२	०६.०६.२०२२	-

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असे कारण नमुद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २९.०४.२०२२ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-
"माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१)(ख) अंतर्गत बाबींची आर्थिक वर्ष दि.०१.०४.२०१९ ते दि. ३१.०३.२०२२ या कालावधीत संकेतस्थळावर, कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित केलेली माहितीची सत्यप्रत द्यावी."

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती कलम ४(१)(ख) अंतर्गत कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर प्रकाशित केली नाही व संकेतस्थळावरही प्रकाशित केलेली नाही. या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांनी कलम ४(१)(ख) अंतर्गतची माहिती १५ दिवसांत प्रकाशित करावी व कोठे प्रकाशित केली याबाबत अपिलार्थींना सुचित करावे. जन माहिती अधिकारी यांनी प्रकाशित माहिती वेळोवेळी अद्ययावत करावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.

२) अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : ०८.०२.२०२३

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई